परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माध्यमिक शिक्षण विभाग
माध्य/शि/०१/कावि/४४४/२०२०
दिनांक -: २४/०८/२०२०

प्रति,

मुख्याध्यापक / प्र.मुख्याध्यापक
माध्यमिक विद्यालये.............
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

विषय – स्थायी अग्रिमधन रक्कमेबाबत........

२/- माध्यमिक शिक्षण विभागाचे अखत्यारित असणा-या १८ माध्यमिक विद्यालयांना त्यांचे काही शालेय खर्चासाठी रक्कम रुपये – १०,०००/- ( अक्षरी रक्कम रूपये दहा हजार रूपये फक्त) स्थायी अग्रीम धनाची रक्कम मंजूर करून अदा करणेत आलेले आहे. सदरची स्थायी अग्रीम धनाची रक्कम बँकेत जमा करून न ठेवता सदर रक्कम शाळेतील कॅश बॉक्स मध्ये ठेवण्यात यावी व सदर बॉक्सच्या कुलूपाची चावी मुख्याध्यापक यांचेकडे ठेवण्यात यावी.

स्थायी अग्रीम धनाच्या रक्कमेमधून विद्यालयासाठी लागणारी आवश्यक स्टेशनरी, जर मध्यवर्ती भांडार विभागात उपलब्ध नसेल व अचानक गरज भासल्यास खरेदी करणे ,काही कार्यालयीन कागदपत्रांच्या झेरॉक्स काढणे,पुस्तके, बेंचेस इतर अवजड वस्तुंची वाहतूक करणेकामी वाहन भाड्यापोटी, कुलूपे खरेदी इत्यादी आवश्यक वस्तुसाठीच खर्च करण्यात यावा.चहापाणी,नाष्टा,सत्काराचे साहित्य यासाठी स्थायी अग्रीम धनातून खर्च करणेत येवू नये.येथून पुढे अशा शालेय शालोपयोगी वस्तुंच्या व्यतिरिक्त इतर गोष्टीवर खर्च केलेल्या खर्चाची बिले प्रतिपुर्ती कामी पाठविल्यास सदरची बिले मंजूर करणेत येणार नाहीत.तसेच सादर केलेल्या बिलांमधील खर्च करणे खरोखरच आवश्यक होते का? व बिलात नमूद केलेल्या गोष्टीवरच खर्च केलेला आहे का? याबाबत शहानिशा करूनच मुख्य कार्यालयाकडून बिले मंजूर करण्यात येतील.

स्थायी अग्रीम धनाच्या नस्तीसोबत रोकड नोंदवही देखील सादर करण्यात यावी, शाळा तपासणीचे वेळी स्थायी अग्रीम धनाची उर्वरित रोख रक्कम तपासणी करणेस आलेल्या कर्मचारी/अधिकारी यांना समक्ष दाखविणे आवश्यक असेल,तसेच यापुर्वी ज्या विद्यालयानी चहापान करीता खर्च करून बिले सादर केली आहेत,त्या विद्यालयांनी पुढील येणा-या स्थायी अग्रीमधन बील प्रतीपुर्ती वेळेस सदर रक्कम मनपा कोषागरात जमा करुनच बील सादर करणेत यावे, तसेच पुढील बीला सोबत स्थायी अग्रीमधन मंजुरीच्या आदेशाची सत्यप्रत सादर करणेत यावी. अन्यथा सदर बील मंजुर केले जाणार नाही.याची संबधीत मुख्याध्यापक,लिपिक यांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

तरी आर्थिक व्यवहार करताना वरील बाबी विचारात घेवुनच खर्च करण्यात यावा,अन्यथा होणा-या आर्थिक अनियमिततेस मुख्याध्यापक यांना सर्वस्वी जबाबदार धरण्यात येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे –१८.